महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र : पोमसं /८अ/पदोन्नती/का.अ.निवडसुची/२०२२-२३/१५५/२०२२ मुंबई दिनांक: १९/०१/२०२३

## -: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद कार्यालय अधीक्षक यांना वरिष्ठ कार्यालय अधीक्षक / प्रशासकिय अधिकारी (राजपत्रित गट ब) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र | कार्यालय अधीक्षक | सध्याचे नियुक्तीचेकार्यालय | पदस्थापनेवरील कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुधाकर बबन टाव्हरे | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर |
| २. | श्री. संतोष रतन बागुल | विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक | पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| ३. | श्री. शरद तुकाराम बोडके | समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ६, धुळे | संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक |

२. उपरोक्त पदोन्नतीची पदस्थापना त्या सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिकाक्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

**रजनिश सेठ**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, नाशिक
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर
समादेशक,राज्य राखीव पोलीस बल गट क्र.६, धुळे

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् /१०८२/सीआर्/११००(२)/अेस्ईआर्-३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नती नंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना..सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ अन्वये केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

२. उपरोक्त कार्यालय अधीक्षक यांच्याविरुध्द आता नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा निवडसूची वर्ष सन २०२२-२३ मध्ये संपुष्टात येत नसेल तर त्यांना पदोन्नतीवर कार्यमुक्त न करता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयात पाठवून पुढील आदेशांची कृपया वाट पाहावी.

३. संबंधित कार्यालय अधीक्षक यांचे विरुध्द काहीच प्रलंबित नसेल तर, त्यांना पदस्थापना केलेल्या कार्यालयात रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच, ज्या कार्यालय अधीक्षक यांना पदोन्नती नाकारायची असेल, अशा कार्यालय अधीक्षक यांनी योग्य मार्फतीने ७ (सात) दिवसाच्या आत न चुकता या कार्यालयास सादर करण्याबाबत संबंधित कार्यालय अधीक्षक यांना सुचना द्याव्यात.

४. पदोन्नत झालेल्या सर्व कार्यालय अधीक्षक यांचे हार्दिक अभिनंदन.

**प्रत कार्यवाहीसाठी,**

**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय**

२. **सदरचे आदेश पोलीस महासंचालक यांचे संकेतस्थळावर सर्वांसाठी एक महिन्याकरिता उपलब्ध करुन द्यावेत.**

**प्रत,**

कार्यासन अधिकारी, कार्यासनक्रमांक १० / १२ / ३६

(अनुप कुमार सिंह)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, यांचेकरिता